रब्बी हंगाम सन २०१७-१८ मध्ये राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करून विविध उपाययोजना व मदत जाहीर करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण - २०१७/प्र.क्र.१७३ /म-७

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

दिनांक: २५ एप्रिल, २०१८

वाचा:- शासन निर्णय,समक्रमांक, दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना :

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार जिल्हातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. संदर्भाधीन शासन निर्णय व दुष्काळ व्यवस्थापन संहितेमध्ये विहित केलेल्या निकषानुसार खरीप २०१७ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करून अशा तालुक्यात विविध उपाययोजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता , पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यामध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून राज्य शासन खाली नमूद केलेल्या तालुक्यांमध्ये **मध्यम स्वरूपाचा दुष्काळ** जाहीर करीत आहे .

अ.क्र.	जिल्हा	तालुके
१.	यवतमाळ	राळेगांव, दिग्रस, घाटंजी, केळापूर व यवतमाळ
२.	वाशिम	वाशिम
३.	जळगांव	मुक्ताईनगर व बोदवड

२. उपरोक्त नमूद केलेल्या तालुक्यांना खालील सवलती लागू करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

३. या आदेशान्वये देण्यात येणाऱ्या विविध सवलतीपोटीचा आर्थिक भार संबंधित प्रशासकीय विभागांनी उचलावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. त्यानुसार या प्रकरणी पुढील उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करण्यात यावा.

४. दुष्काळ घोषित करण्यात आलेल्या तालुक्यांमधील शाळांमध्ये मध्यान्ह भोजन योजना दिर्घ सुट्टीच्या कालावधीत देखील राबविण्यात यावी. तसेच मध्यान्ह भोजन योजना व एकात्मिक बालविकास योजनेतंर्गत (ICDS) मुलांना पौष्टीक अन्न देण्यात यावे.

५. सदर तालुक्यातील खातेदारांना कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान अनुज्ञेय राहील. सदर निविष्ठा अनुदान हे कोरडवाहू पिक उत्पादित केलेल्या व ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या खातेदारांना अनुज्ञेय राहील. निविष्ठा अनुदानाचे दर व इतर अटी व शर्ती या शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३ मे, २०१५ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

६. सदर मदतीचे वाटप सन २०१७-१८ च्या रब्बी हंगामातील ७/१२ मधील पिकांच्या नोंदीच्या आधारे करण्यात यावे.

७. हंगामातील अंतिम पैसेवारीसाठी करण्यात आलेल्या पिक कापणी प्रयोगाअंती आलेल्या पिक निहाय पैसेवारीच्या आधारे कोरडवाहू पीकांचे ३३ टक्के नुकसान ठरविण्यात यावे.

८. बहुवार्षिक फळपिके व बागायती पिके यांचे ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान झाल्याची शहनिशा शेतीनिहाय पंचनामे करून करण्यात यावे. पंचनाम्यासोबत अशा शेतीतील पिकांचे ग्लोबल पोजिशनिंग सिस्टीम (GPS coordinates) दर्शविणारे फोटो काढण्यात यावेत. जेणेकरून नुकसानीच्या दाव्याची ग्राह्यता पडताळता येईल.

९. बहुवार्षिक फळपिके व बागायती पिकांचे नुकसान ठरविण्याचा निकष हा ७/१२ मधील नोंद असेल.नुकसानीची तीव्रता ठरविण्यासाठी पंचनामा हा निकष असेल.बहुवार्षिक फळपिके व बागायती पिकांचे नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी शेतीमध्ये पिके नसल्यास संबंधित शेतीमध्ये आलेले उत्पादन हे सरासरी पिक उत्पादनाच्या ६७% किंवा त्यापेक्षा कमी असल्यास मदत अनुज्ञेय राहील.

१०. सन २०१७-१८ च्या रब्बी हंगामातील पिक पाहणी मधील पिकांच्या ७/१२ मधील नोंदीबाबत कोणताही आक्षेप उद्भवल्यास त्याचे निराकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील तरतूदीनुसार करण्यात यावे.

११. सदरहू आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. संबधित जिल्हाधिकारी यांनी या आदेशात दिलेल्या सूचनाप्रमाणे बाधित शेतकऱ्यांना

निविष्ठा अनुदान वितरित करण्यासाठी निधीची परिगणना करून त्याची मागणी शासनाकडे तातडीने नोंदवावी.

१२. शासनाने हे आदेश तत्पूर्वी रद्द न केल्यास दुष्काळ घोषित केल्याचे आदेश पुढील ६ महिन्यांच्या कालावधी पर्यंत लागू राहतील. संबंधित जिल्हाधिकारी यांनी या आदेशास जिल्हयामध्ये प्रसिध्दी द्यावी. तसेच संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांमध्ये आवश्यक उपाययोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी तातडीने आवश्यक उपाययोजना अंमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२५१२१८५९३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.04.25 12:22:12 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल,मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य,
५) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
८) अपर मुख्य सचिव (सहकार),सहकार व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
९) अपर मुख्य सचिव (कृषी), मंत्रालय,मुंबई,
१०) अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), जी.टी. हॉस्पीटल,मुंबई
११) प्रधान सचिव (उर्जा),उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा),मंत्रालय,मुंबई
१३) प्रधान सचिव(सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण), जी.टी. हॉस्पीटल,मुंबई
१४) सचिव (जलसंधारण व रोहयो),मंत्रालय,मुंबई
१५) सचिव (महिला व बाल विकास), नवीन प्रशासन भवन,मुंबई
१६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
१७) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१८) सर्व विभागीय आयुक्त,
१९) सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे
२०) जिल्हाधिकारी, यवतमाळ/वाशिम/जळगांव
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ/वाशिम/जळगांव
२२) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ/वाशिम/जळगांव
२३) अधिक्षक जिल्हा कृषी अधिकारी, यवतमाळ/वाशिम/जळगांव
२४) जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, यवतमाळ/वाशिम/जळगांव
२५) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२६) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२७) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय)
२८) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन,
२९) महसूल व वन विभागातील (कार्यासन क्रमांक म-३/म-७/म-११)
३०) निवडनस्ती (कार्यासन म-७)